शनिवार दि. १३ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेश्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# महानगरपालिकेच्या इतिहासात नवा अध्याय

## *पाणी, कचरा, अतिक्रमण आणि मोकाट जनावरांच्या प्रश्नांवर मनपाची स्पष्ट भूमिका
## *आयुक्त अंजली शर्मा यांचा पत्रकार संवाद उपक्रम शहर विकासाला देणार नवी दिशा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर जालना महानगरपालिकेने प्रशासन आणि माध्यमांमधील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी पत्रकारांसाठी दर महिन्याला दोन वेळा विशेष संवाद बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेतला असून, जालना नगरपालिकेपासून ते महानगरपालिका होईपर्यंतच्या इतिहासात प्रथमच असा उपक्रम राबविण्यात येत असल्याने त्याचे स्वागत होत आहे.

शुक्रवार, १२ जून रोजी आयुक्तांच्या दालनात आयोजित पत्रकार वार्तालाप बैठकीत शहरातील विविध नागरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पत्रकारांनी शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, मोकाट जनावरे, भटके कुत्रे आणि मूलभूत सुविधांबाबतच्या समस्या आयुक्तांसमोर मांडल्या. या सर्व सूचना आणि तक्रारींची नोंद घेत त्यावर टप्प्याटप्प्याने कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही आयुक्तांनी दिली.

पत्रकारांसाठी महिन्यातून दोन वेळा विशेष वेळ

शहरातील समस्यांची माहिती प्रशासनापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचावी आणि नागरिकांच्या अडचणींवर त्वरित उपाययोजना व्हाव्यात, यासाठी महिन्यातील दोन शुक्रवार दुपारी ४ ते ५ हा वेळ पत्रकारांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहे.

या बैठकीत पत्रकार शहरातील विविध भागांतील समस्या, नागरिकांच्या तक्रारी तसेच विकासात्मक सूचना थेट आयुक्तांसमोर मांडू शकणार आहेत. प्रशासन आणि माध्यमांमधील हा संवाद शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**पाणीपुरवठा प्रश्नावर मनपाचे लक्ष**

जालना शहरातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत आयुक्तांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. शहरातील काही भागांमध्ये अद्यापही नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी असल्याचे त्यांनी मान्य केले.

फिल्टर बेडचे काम अंतिम टप्प्यात असून ते पूर्ण झाल्यानंतर शहरातील सर्व भागांमध्ये अधिक नियमित आणि संतुलित पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल. डिसेंबर २०२६ पर्यंत या प्रक्रियेत लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

कचरा व्यवस्थापनासाठी नवे नियोजन

शहरातील कचरा व्यवस्थापनाबाबतही मनपाने व्यापक नियोजन सुरू केले आहे. मोतीबाग परिसरातील अमृतवाणी भागात



अनधिकृतरीत्या कचरा टाकला जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने कचरा संकलन व्यवस्थेत सुधारणा करण्याचे ठरविले आहे.

नवीन जालना आणि जुना जालना भागात स्वतंत्र कचरा संकलन केंद्र उभारण्यासाठी जागांचा शोध सुरू आहे. या केंद्रांमधून कचरा सामनगाव येथील प्रक्रिया प्रकल्पाकडे पाठविण्यात येणार आहे. वाढत्या कचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर सामनगाव येथील जागा वाढविण्याचे प्रयत्नही सुरू असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

**मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांवर**

**कायमस्वरूपी उपाय**

जालना शहरातील नागरिकांना सर्वाधिक त्रासदायक ठरत असलेल्या मोकाट जनावरांच्या प्रश्नावरही मनपा आता कठोर भूमिका घेणार आहे. शहरात कोंडवाडा उभारण्याचे काम सुरू असून, रस्त्यांवर जनावरे सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा आयुक्तांनी दिला. रस्त्यांवरील अपघात, वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम आखल्याचेही त्यांनी सांगितले.

अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम

शहरातील वाढत्या अतिक्रमणांमुळे वाहतूक व्यवस्था आणि (पान २ वर)

''मला जालना महानगरपालिकेत रुजू होऊन अवघे दोन महिने झाले आहेत. या कालावधीत शहरातील विविध समस्या, नागरिकांच्या अपेक्षा आणि विकासाच्या गरजा समजून घेण्याचा प्रयत्न करत आहे. पत्रकार हे शहराचे सजग प्रहरी असून त्यांना शहरातील वास्तव परिस्थितीची सखोल माहिती असते. त्यामुळे पत्रकारांनी शहरातील समस्या, त्रुटी तसेच सकारात्मक सूचना प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात. माध्यमांच्या सहकार्यामुळे शहरात सकारात्मक बदल घडवून आणणे अधिक सुलभ होईल.''

''जालना शहरातील लोकप्रतिनिधी आणि नगरसेवक विकासकामांसाठी सकारात्मक भूमिका घेत आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून शहराच्या विकासाला गती मिळू शकते. सध्या महानगरपालिकेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्यामुळे काही कामांमध्ये अडचणी निर्माण होत असल्या तरी त्या आव्हानांवर मात करण्यासाठी आम्ही सर्वजण प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहोत.''''पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, मोकाट जनावरे यांसारख्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न सोडविणे हे आमचे प्राधान्य आहे. नागरिक, पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या सामूहिक सहभागातून जालना शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि विकसित करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आगामी काळात शहराच्या विकासासाठी अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न राहील.''

**- अंजली शर्मा**
**आयुक्त, जालना शहर महानगरपालिका**



**जालना जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, उद्योगपती व समाजसेवक तसेच कालिका स्टीलचे संचालक श्री घनश्याम सेठ गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांना भेट देऊन शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील सेठ गोयल, गोपाल सेठ गोयल, डॉ. सुभाष अजमेरा, मेघराज चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.**

# मनपा शाळांच्या दयनीय अवस्थेची राज्य बालहक्क आयोगाने घेतली गंभीर दखल

## एक महिन्यात सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश; आयोगाची प्रत्यक्ष पाहणी होणार

**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका क्षेत्रातील शाळांची दयनीय अवस्था, अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, मोडकळीस आलेल्या इमारती, स्वच्छतागृहांचा अभाव, शिक्षकांची कमतरता आणि घटती विद्यार्थी संख्या या गंभीर मुद्द्यांवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगासमोर मंगळवारी महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीत आयोगाने जालना महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागाला चांगलेच धारेवर धरत तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले. सुनावणीस जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगीता भागवत, मनपा उपायुक्त सुप्रिया चव्हाण, एम. व्ही. मंडलिक, समीर भोईर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील १६ शाळांमध्ये सध्या केवळ सुमारे ११०० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची बाब समोर आली. अनेक शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असून त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छतागृह, क्रीडा सुविधा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध नसल्याची बाब आयोगाने अत्यंत गंभीर मानली. मनपा शाळांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने खर्च केला जात आहे का, याबाबत आयोगाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गेल्या पाच वर्षांत शिक्षणासाठी करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि त्याचे तपशील आयोगाने मागविले आहेत. तसेच सर्व १६ शाळांचे छायाचित्रांसह सविस्तर अहवाल, शाळांना उपलब्ध निधी व खर्चाचा तपशील, शैक्षणिक सुविधांची (पान २ वर)

**मनपा शाळांचा प्रत्यक्ष आढावा घेणार : डॉ. संजय लाखे पाटील**



जालना महानगरपालिका क्षेत्रातील शाळांची सद्यस्थिती, विद्यार्थ्यांना उपलब्ध सुविधा, शाळांच्या इमारतींची अवस्था, स्वच्छता, शिक्षणाचा दर्जा आणि विद्यार्थी प्रवेश वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा प्रत्यक्ष आढावा महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाचे चेअरमन ॲड संजय पुराणिक व सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत पुढील सुनावणी व प्रत्यक्ष पाहणी जालना येथेच केली जाणार असल्याचे महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ संजय लाखेपाटील यांनी सांगितले आहे. आयोगाच्या पथकाकडून महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित कोणतीही बाब दुर्लक्षित केली जाणार नसून आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याबाबत प्रशासनाला निर्देश दिलेले आहेत असेही यावेळी डॉ संजय यांनी सांगितले गरीब तसेच झोपडपट्ट्या तील वंचित मुले यांचा शिक्षणाचा हक्क, सुरक्षित शैक्षणिक वातावरण आणि गुणवत्तापूर्ण सुविधा या सर्व विद्यार्थ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत आणि बालस्नेही महाराष्ट्र झाला पाहिजे या भूमिकेतून बालहक्क संरक्षण आयोगाकडून राज्यभरातील विशेषतः महानगर पालिका, नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे.

# पैशांसाठी चिमुकल्याचे हातपाय बांधून अमानुष अत्याचार; व्हिडिओ व्हायरल होताच पोलिसांची धडक कारवाई

## सावत्र वडिलांकडून निष्पाप बालकाला बेदम मारहाण; पोलिसांनी सुखरूप सुटका करून गुन्हा दाखल केला

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यासह संपूर्ण राज्याला हादरवून सोडणारी आणि मानवतेला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. पैशांच्या वादातून एका निष्पाप चिमुकल्याचे हातपाय बांधून त्याला अमानुषपणे मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या क्रूरतेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने तातडीने हालचाली करत संबंधित बालकाची सुखरूप सुटका केली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. निष्पाप बालकावर झालेल्या या अत्याचारामुळे समाजमन सुन्न झाले असून आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

**व्हायरल व्हिडिओने उघड केला क्रौर्याचा चेहरा**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित बालकाच्या आईच्या दुसऱ्या पतीने पैशांच्या कारणावरून चिमुकल्याला लक्ष्य केले. आरोपीने बालकाचे हातपाय बांधून त्याला निर्दयीपणे मारहाण केल्याचे समोर आले आहे. या अमानुष



कृत्याचा व्हिडिओ काही व्यक्तींच्या माध्यमातून सोशल मीडियावर व्हायरल झाला.

व्हिडिओ पाहून नागरिकांनी संताप व्यक्त करत पोलिसांनी तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी केली. काही तासांतच हा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्यानंतर प्रशासनालाही या घटनेची गंभीर दखल घ्यावी लागली.

**पोलिसांची तत्पर कारवाई; चिमुकल्याची सुखरूप सुटका**

व्हिडिओ व्हायरल होताच जालना पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली. संबंधित बालकाचा शोध घेण्यासाठी विशेष पथक सक्रिय करण्यात आले. पोलिसांनी विविध ठिकाणी चौकशी करून बालकाचा ठावठिकाणा शोधला आणि त्याची सुखरूप सुटका केली.

सध्या बालक सुरक्षित असून त्याला त्याच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. बालकाच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीबाबतही संबंधित यंत्रणांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

**आरोपीविरोधात गुन्हा दाखल**

या प्रकरणी बालकाच्या आईच्या दुसऱ्या पतीविरोधात जाफराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी विविध कायदेशीर तरतुदींनुसार आरोपीविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

प्राथमिक तपासात ही घटना जालना जिल्ह्याबाहेरील शिर्डी परिसरात (पान २ वर)

### जालन्यात १४ वर्षीय विद्यार्थिनीवरील अत्याचार प्रकरण; शिक्षक ताब्यात

# पीडितेच्या तक्रारीनंतर कदीम जालना पोलिसांकडून गुन्हा दाखल; डिजिटल पुराव्यांचीही तपासणी सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात १४ वर्षीय विद्यार्थिनीवरील कथित लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित आरोपी शिक्षक विक्की शिंदे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, पीडित विद्यार्थिनीची आणि संशयित शिक्षकाची सुमारे वर्षभरापूर्वी ओळख झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये मोबाईलद्वारे संपर्क वाढला. या काळात खाजगी छायाचित्रांची देवाणघेवाण झाल्याचा आरोप



करण्यात आला आहे. तसेच आरोपीने विद्यार्थिनीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी संशयिताने पुन्हा विद्यार्थिनीकडे शारीरिक संबंध ठेवण्याचा आग्रह धरल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर घाबरलेल्या विद्यार्थिनीने संपूर्ण प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. पालकांनी तातडीने कदीम जालना पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

तक्रारीची गंभीरता लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून आरोपी शिक्षकाला ताब्यात घेतले. या प्रकरणात मोबाईलमधील संदेश, कॉल रेकॉर्ड, छायाचित्रे आणि इतर डिजिटल पुराव्यांची तपासणी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अल्पवयीन मुलगी संबंधित असल्याने (पान २ वर)

# संपादकीय...

## पत्रकारांचा बहिष्कार : व्यक्तीविरोध नव्हे, लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा इशारा

जालना येथे भाजपच्या पत्रकार परिषदेला पत्रकारांनी दिलेला बहिष्कार हा एखाद्या राजकीय पक्षाविरोधातील रोष नव्हता, तर लोकशाही व्यवस्थेतील परस्पर सन्मान, उत्तरदायित्व आणि वेळेच्या मूल्याची जाणीव करून देणारा एक महत्त्वपूर्ण संदेश होता. या घटनेकडे केवळ एका पत्रकार परिषदेतील वाद म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलटपक्षी, हा प्रसंग लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष आणि माध्यमे यांच्यातील नातेसंबंधाचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आहे.

लोकशाहीत पत्रकार हे चौथा स्तंभ म्हणून ओळखले जातात. शासन, प्रशासन आणि जनतेमध्ये संवादाचा पूल उभारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार करत असतात. शासनाच्या योजना, धोरणे आणि विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम म्हणून पत्रकार परिषदांचे आयोजन केले जाते. त्यामुळे अशा कार्यक्रमांमध्ये वेळेचे आणि शिष्टाचारांचे पालन करणे ही केवळ औपचारिकता नसून लोकशाही मूल्यांचा एक भाग आहे.

जालना येथील घटनेत पत्रकारांना सकाळी ठराविक वेळ देण्यात आली होती. मात्र संबंधित लोकप्रतिनिधींच्या विलंबामुळे पत्रकारांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागली. या प्रतीक्षेमुळे निर्माण झालेला रोष हा स्वाभाविक होता. पत्रकार हे कोणत्याही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते नसतात; ते स्वतंत्र माध्यम प्रतिनिधी असतात. त्यांनाही इतरांप्रमाणे वेळेचे नियोजन, जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक मर्यादा असतात. त्यामुळे पत्रकारांनी आपला स्वाभिमान जपत बहिष्काराचा मार्ग स्वीकारला, याकडे व्यावसायिक स्वाभिमानाच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. विशेष म्हणजे या बहिष्कारामागे कोणत्याही पक्षाविषयी वैयक्तिक आकस किंवा राजकीय भूमिका नव्हती. हा निर्णय वेळेच्या अवमानाविरोधातील होता. म्हणूनच प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी व्यक्त केलेली भूमिका महत्त्वाची ठरते. ''बहिष्कार कोणाविरोधात नाही, पत्रकारांच्या सन्मानासाठी आहे,'' हे त्यांचे विधान या घटनेचे अचूक सार अधोरेखित करते.

अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी राजकीय नेते, अधिकारी किंवा सार्वजनिक पदांवरील व्यक्ती कार्यक्रमांना उशिरा पोहोचणे ही जणू सामान्य बाब बनत चालली आहे. मात्र सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी वेळेचे महत्त्व ओळखणे अत्यावश्यक आहे. कारण वेळेचा आदर हा व्यक्तीच्या कार्यसंस्कृतीचे आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक असतो. पत्रकार परिषदेसाठी उशीर होणे ही केवळ व्यवस्थापनातील त्रुटी नसून संवाद प्रक्रियेतील असंवेदनशीलता मानली जाऊ शकते.

या घटनेचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे पत्रकारांची एकजूट. विविध माध्यमांतील पत्रकारांनी एकत्रित भूमिका घेत स्वाभिमानाचा प्रश्न ऐरणीवर आणला. लोकशाहीमध्ये माध्यमांचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी अशा व्यावसायिक एकजुटीची आवश्यकता असते. कारण माध्यमांची ताकद केवळ प्रश्न विचारण्यात नसते, तर स्वतःच्या सन्मानासाठी उभे राहण्यातही असते. यातून सर्व राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी योग्य तो धडा घेण्याची गरज आहे. माध्यमे ही विरोधक नाहीत, तर जनतेशी संवाद साधण्याचे प्रभावी साधन आहेत. त्यांच्या वेळेचा, श्रमांचा आणि भूमिकेचा आदर राखणे हे लोकशाही सुदृढ करण्यासाठी आवश्यक आहे.

जालन्यातील हा बहिष्कार एका दिवसाची घटना असली तरी त्यातून दिलेला संदेश दीर्घकालीन आहे. लोकशाहीतील प्रत्येक घटकाला परस्पर सन्मान आणि उत्तरदायित्वाची जाणीव असली पाहिजे. कारण व्यक्तीपेक्षा मूल्ये मोठी असतात, पदापेक्षा शिस्त मोठी असते आणि सत्तेपेक्षा लोकशाही अधिक मोठी असते.

## जालना-संभाजीनगर शटल ट्रेन सुरू करा; अन्यथा आंदोलन छेडू-सुभाषचंद्र देविदान

### जालना रेल्वे संघर्ष समितीचा आक्रमक पावित्रा

**जालना - प्रतिनिधी**

जालना आणि संभाजीनगर या दोन्ही शहरांमधील वाढती प्रवासी संख्या, व्यापारी दळणवळण आणि विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेता, जालना-संभाजीनगर शटल ट्रेन दिवसातून दोन वेळा योग्य वेळेत सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी जालना रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष सुभाषचंद्र देविदान यांनी केली आहे.



या संदर्भात यापूर्वी दोन वेळा निवेदन देऊनही रेल्वे प्रशासनाकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे शनिवार दि. १२ जून रोजी समितीच्यावतीने नांदेड रेल्वे विभागाचे विभागीय प्रबंधकांना पुन्हा एकदा ई-मेलद्वारे स्मरणपत्र व निवेदन पाठवण्यात आले आहे. निवेदनात अध्यक्ष सुभाषचंद्र देविदान यांनी म्हटले आहे की, जालना आणि संभाजीनगर ही दोन्ही शहरे आता औद्योगिक दृष्ट्या एकमेकांशी जोडली गेली असून ती एक संयुक्त शहर (ट्विन सिटी) म्हणून नावारूपास येत आहेत. जालना येथे भारताचा महत्त्वाचा ड्रायपोर्ट प्रकल्प सुरू झाल्यामुळे मालवाहतूक, व्यावसायिक आणि प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. हजारो विद्यार्थी, चाकरमानी आणि नागरिक दररोज या दोन्ही शहरांदरम्यान सवलत पास (सीझनल पास) काढून प्रवास करतात. मात्र, पुरेशा रेल्वे फेऱ्यांअभावी या प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. जालना आणि संभाजीनगर दरम्यान सध्या बंद असलेली दिनेगाव - गेवराई ही रेल्वे स्थानके त्वरित पूर्ववत सुरू करण्यात यावीत, दोन्ही शहरांच्या दरम्यान असलेल्या पंचतारांकित शेंद्रा एम.आय.डी.सी. येथे नवीन रेल्वे स्थानक उभारण्यात यावे, जेणेकरून तेथील कामगार व उद्योजकांना मोठा फायदा होईल, प्रवाशांच्या सोयीसाठी जालना-संभाजीनगर दरम्यान दिवसातून दोन फेऱ्या मारणारी शटल ट्रेन योग्य वेळेनुसार तात्काळ सुरू करण्यात यावी, आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

रेल्वे प्रशासनाने या जनहितार्थ मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केले आहे. जर या तिसऱ्या निवेदनानंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर जालना रेल्वे संघर्ष समिती नागरिकांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही अध्यक्ष सुभाषचंद्र देविदान, कार्याध्यक्ष अंकुशराव राऊत, महासचिव फिरोज अली आणि उपाध्यक्ष अशोक मिश्रा यांनी दिला आहे.

## सिंगोना येथील मयत पांडुरंग कदम यांच्या वारसाला एसबीआय बँकेकडून ४० लाखांचा विमा धनादेश सुपूर्द

### दोन हजार रुपयांच्या पॉलिसीने कुटुंबाला दिला आर्थिक आधार




**परतूर - प्रतिनिधी**

तालुक्यातील सिंगोना येथील रहिवासी पांडुरंग अंजीराम कदम (वय ४२) यांचे गतवर्षी २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सिंगोना पाटीवर झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी निधन झाले होते. त्यांनी भारतीय स्टेट बँकेची (एसबीआय) अवघ्या दोन हजार रुपयांचा प्रिमियम भरून जनरल इन्शुरन्स अपघाती विमा पॉलिसी काढली होती. त्यांच्या या अपघाती निधनानंतर बँकेने सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत अत्यंत तत्परतेने त्यांच्या वारसाला तब्बल चाळीस लाख रुपयांचा अपघाती विमा मंजूर केला. या मंजूर विमा रक्कमेचा चाळीस लाख रुपयांचा धनादेश मयत पांडुरंग कदम यांच्या वारसदार पत्नी शिला पांडुरंग कदम यांना १० जून २०२६ रोजी परतूर येथील एसबीआय मुख्य शाखेत मुख्य शाखा व्यवस्थापकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कुटुंबाचा मुख्य आधार हरपलेल्या कदम कुटुंबाला या कठीण काळात बँकेच्या दोन हजार रुपयांच्या पॉलिसीमुळे चाळीस लाख रुपयांचे मोठे आर्थिक छत्र लाभले आहे. या विमा रक्कम धनादेश वितरणप्रसंगी बँकेचे शाखा प्रबंधक विजय राम, उपप्रबंधक हर्षवर्धन मुन, संध्या रसाळ, प्रज्वल सावंत, योगेश धानुरे, आकाश राजनकर, अशय नानवटकर, वैष्णवी क्षीरसागर, शिवाजी कुलकर्णी, मुलगा सहदेव कदम, भाऊ विठ्ठल कदम,भरत सुरुंग यांच्यासह बँक कर्मचारी उपस्थित होते.

प्रत्येक नागरिकाने व बँकेच्या ग्राहकांनी आपल्या कुटुंबाच्या भविष्यातील सुरक्षेसाठी अशा विमा योजनांचा लाभ घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे आवाहन यावेळी बँक प्रशासनाच्या वतीने मुख्य शाखा व्यवस्थापक विजय राम यांनी केले आहे.

# भारताचे महान गणितज्ञ 'आर्यभट्ट' यांच्या विडंबनप्रकरणी ॲमेझॉन इंडियाला कायदेशीर नोटीस!

### व्यावसायिक फायद्यासाठी राष्ट्रीय वारशाचा अवमान खपवून घेणार नाही - हिंदु जनजागृती समिती

**मुंबई/नवी दिल्ली**

प्राचीन भारताचे महान गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट यांचे व्यावसायिक जाहिरातीत अत्यंत हीन पातळीवर विडंबन केल्याप्रकरणी ई-कॉमर्स क्षेत्रातील नामांकित कंपनी ॲमेझॉन इंडियाला कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असणाऱ्या हिंदु जनजागृती समितीच्या अधिवक्त्या अमिता सचदेवा यांनी ही नोटीस बजावली असून ॲमेझॉनने ४८ तासांत भारतीय जनतेची जाहीर माफी मागून ही वादग्रस्त जाहिरात तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी केली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास ॲमेझॉन विरोधात फौजदारी आणि दिवाणी खटला दाखल केला जाईल, असा स्पष्ट इशारा नोटीसच्या माध्यमातून दिला आहे. दरम्यान या जाहिरातीमुळे देशभरातील राष्ट्रप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, सामाजिक माध्यमांवर ॲमेझॉन वर बहिष्काराची _() ऑनलाईन मोहीम प्रचंड वेगाने पसरत आहे.

या जाहिरातीत आर्यभट्ट यांच्या वेशातील एका व्यक्तीला उभे करून त्यांना 'शून्य डिलिव्हरी चार्जेस शोधणारा शास्त्रज्ञ' अशा उपरोधिक आणि विनोदी स्वरूपात सादर करण्यात आले आहे. ज्या थोर ऋषितुल्य शास्त्रज्ञाने जगाला 'शून्याची' अमूल्य संकल्पना दिली आणि भारताचा वैज्ञानिक ध्वज जगभरात फडकावला, त्यांना केवळ एका व्यावसायिक फायद्यासाठी 'कॉर्पोरेट मस्कट' (विनोदी व्यावसायिक पात्र) बनवून त्यांची क्रूर थट्टा उडवणे हा भारताच्या महान ज्ञान-वारशाचा आणि राष्ट्रीय अस्मितेचा जाणीवपूर्वक केलेला अवमान असल्याचे या नोटीशीमध्ये म्हटले आहे.

व्यावसायिक फायद्यासाठी भारतीय संस्कृती आणि हिंदू प्रतीकांचा अवमान करण्याची ॲमेझॉनची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वीही कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर श्री गणेश आणि माता लक्ष्मी यांची चित्रे असलेले पायपुसणे, टॉयलेट सीट कव्हर्स विकणे, तसेच 'तांडव' वेबसिरीजच्या माध्यमातून धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी तीव्र विरोधानंतर कंपनीला माफी मागावी लागली होती. केवळ व्यावसायिक लाभासाठी भारतीय राष्ट्रपुरुषांचा जाणीवपूर्वक अपमान करण्याचे हे कृत्य सुधारित भारतीय न्याय संहितेच्या () कलम २९९ (धार्मिक भावना दुखावणे), कलम १९६ व १९७ (समाजात तेढ निर्माण करून राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहोचवणे) आणि कलम ३०२ (धार्मिक भावना दुखावण्याचा हेतू) अन्वये थेट फौजदारी व दिवाणी कारवाईस पात्र ठरते, याकडे नोटिशीतून लक्ष वेधण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीने ॲमेझॉनला अटी पूर्ण करण्यासाठी ४८ तासांचा मुदत दिली आहे. त्यानुसार ही वादग्रस्त जाहिरात यु-ट्यूब, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि टेलिव्हिजनसह सर्व डिजिटल प्लॅटफॉर्मवरून कायमची हटवण्यात यावी; कंपनीने आपल्या अधिकृत समाजमाध्यमांवर, वेबसाईटच्या मुख्य पानावर आणि देशातील आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये जाहीर व बिनशर्त माफी मागावी; तसेच भविष्यात राष्ट्रीय प्रतीकांचा वा राष्ट्रपुरुषांचा अवमान न करण्याचे लेखी आश्वासन द्यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत या मागण्या पूर्ण न झाल्यास, न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा समितीच्या ॲड्. अमिता सचदेवा यांनी दिला आहे.

**श्री. रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती,**
**(संपर्क : ९९८७९६६६६६)**

## बावणे पांग्री-राजूर रोडवर राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई; ६.३४ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध मद्य वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई करत तब्बल ६ लाख ३४ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बदनापूर तालुक्यातील बावणे पांग्री शिवार ते राजूर रोड परिसरात सापळा रचून करण्यात आलेल्या या कारवाईत देशी दारूचा मोठा साठा वाहतूक करणारे वाहन पकडण्यात आले असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

राज्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे भरारी पथकाने ही कारवाई केली.

**खबरीच्या माहितीवरून सापळा**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाला बदनापूर तालुक्यातील बावणे पांग्री शिवारातून अवैध मद्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. माहितीची खातरजमा करून पथकाने जालना-राजूर मार्गावर सापळा रचला.

दरम्यान, संशयित हालचाली करणारे महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे बुलेरो पिकअप वाहन (क्रमांक -२१ -६३६६) थांबवून त्याची तपासणी करण्यात आली. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर देशी मद्याचा साठा आढळून आला.

**२२ बॉक्समध्ये १,०५६ बाटल्या**

तपासणीदरम्यान वाहनातून देशी दारूचे एकूण २२ बॉक्स जप्त करण्यात आले. या बॉक्समध्ये १,०५६ सिलबंद बाटल्या असल्याचे निष्पन्न झाले. परवानगीशिवाय अवैधरीत्या वाहतूक केली जात असल्याने संपूर्ण मद्यसाठा जप्त करण्यात आला.

कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मद्यसाठ्यासह बुलेरो पिकअप वाहनाचा समावेश असलेला एकूण ६ लाख ३४ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

**दोघांविरुद्ध गुन्हा दाखल**

या प्रकरणी दीपक ज्ञानदेव पडूळ (वय ३३) आणि भागवत मोहन इंगळे (वय २२), दोघेही रा. बाजी उमरद, ता. जि. जालना यांच्याविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अवैध मद्यसाठा नेमका कुठून आणण्यात आला होता आणि तो कुठे नेण्यात येणार होता, याचा तपास सध्या सुरू आहे. या रॅकेटमध्ये आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

## पान १ व ४ चार वरुन...

### महानगरपालिकेच्या...

नागरी सुविधा प्रभावित होत असल्याचे लक्षात घेऊन महानगरपालिका लवकरच विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबविणार आहे.

रेल्वे स्थानक परिसर, शनी मंदिर परिसर, पाणीवेस, बडी सडक यांसारख्या महत्त्वाच्या भागांमध्ये कारवाई करण्यात येणार असून कोणालाही नियमांपासून सूट दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले.

विशेष म्हणजे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांवर अतिक्रमण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होईल. यात लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक किंवा त्यांच्या नातेवाईकांचाही समावेश असल्यास नियमांनुसार कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट भूमिका आयुक्तांनी मांडली.

**प्रशासन आणि माध्यमांमधील समन्वयाची नवी सुरुवात**

स्थानिक पत्रकार हे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा असतात. नागरिकांच्या समस्या सर्वप्रथम माध्यमांमार्फत समोर येतात. त्यामुळे पत्रकारांशी नियमित संवाद साधण्याचा निर्णय प्रशासनाला प्रत्यक्ष समस्या समजून घेण्यास आणि त्यावर जलद निर्णय घेण्यास मदत करणार आहे.

जालना महानगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच सुरू झालेला हा उपक्रम पारदर्शक प्रशासन, जबाबदार लोकसहभाग आणि विकासाभिमुख नियोजनाला चालना देणारा ठरू शकतो, असे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

**शहर विकासासाठी सकारात्मक पाऊल**

पाणीपुरवठा, स्वच्छता, वाहतूक, अतिक्रमण, पर्यावरण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने पत्रकारांच्या माध्यमातून थेट अभिप्राय घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे समस्यांची माहिती अधिक वेगाने प्रशासनापर्यंत पोहोचणार असून त्यावर प्रभावी कार्यवाही होण्याची शक्यता वाढली आहे.

जालना शहराच्या विकासासाठी प्रशासन, माध्यमे आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आयुक्त अंजली शर्मा यांनी उचललेले हे पाऊल निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असून शहराच्या सुशासन आणि विकास प्रक्रियेला नवी दिशा देणारे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मनपा शाळांच्या...

सद्यस्थिती, स्ट्रक्चरल ऑडिट, स्वच्छतागृहे, परिसरातील झोपडपट्ट्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी तयार केलेला आराखडा तसेच शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी एका महिन्यानंतर जालना येथे होणार असून त्यावेळी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य प्रत्यक्ष जालना दौरा करून मनपा शाळांची पाहणी करणार आहेत.

### पैशांसाठी चिमुकल्याचे...

घडल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे पुढील तपास आणि कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित गुन्हा शिर्डी येथील अधिकार क्षेत्रातील पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात येणार असल्याची माहिती जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी दिली.

**बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

या घटनेमुळे बालकांवरील अत्याचारांच्या वाढत्या घटनांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. कुटुंबातीलच व्यक्तीकडून अशा प्रकारची अमानुष वागणूक मिळणे ही अत्यंत धक्कादायक बाब असल्याचे सामाजिक कार्यकर्ते आणि बालहक्क संघटनांचे म्हणणे आहे.

बालकांना संरक्षण देण्यासाठी असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, समाजात जागृती आणि अशा घटनांबाबत त्वरित तक्रार नोंदविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**सोशल मीडियावर संतापाची लाट**

घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. आरोपीविरोधात कठोरात कठोर कारवाई करून त्याला कायद्याने जास्तीत जास्त शिक्षा व्हावी, अशी मागणी अनेकांनी केली आहे.

बालहक्कांसाठी काम करणाऱ्या विविध संघटनांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच बालकाच्या पुनर्वसनासाठी आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**सखोल तपास सुरू**

पोलिसांकडून संपूर्ण घटनेचा सखोल तपास सुरू असून व्हिडिओची सत्यता, घटनेची नेमकी पार्श्वभूमी, मारहाणीमागील कारणे आणि इतर संबंधित बाबींची चौकशी करण्यात येत आहे. आरोपीविरोधात बालक संरक्षण आणि अत्याचारासंदर्भातील लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. निष्पाप बालकावर झालेल्या या अमानुष अत्याचारामुळे संपूर्ण समाज हादरला असून, अशा प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कठोर शिक्षा आणि सामाजिक जागरूकता दोन्ही तितक्याच आवश्यक असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

### पीडितेच्या तक्रारीनंतर...

या प्रकरणात कायद्यासह इतर संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात येत आहे. आरोपीची चौकशी सुरू असून घटनेशी संबंधित सर्व बाबींचा सखोल तपास केला जात आहे.

या घटनेमुळे शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून दोषींवर कठोर कारवाई करून पीडितेला न्याय मिळावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच भर देण्याचे आवाहन केले आहे.

### मंठा बसस्थानक...

बसनेच प्रवास करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्य परिवहन महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी रवींद्र जाधव, सज्जनसिंग जारवाल, जिल्हा वाहतूक शाखेचे आर. जी. चव्हाण, डी. ए. जाधव, चालक व्ही. जी. चव्हाण यांनी नो पार्किंग झोन मधील वाहनांवर कारवाई केली.

### लोणचे तयार...

वापर यासाठी करावा लागतो यामुळे व्यापाऱ्यांकडून दररोज पाहिजे तेवढ्याच कैऱ्या झाडावरून काढल्या जातात. याशिवाय ग्रामीण भागातील अनेक जण लोणच्याचा आंबा तयार असल्याचे सांगत झाडाखालीच विक्री करतात.

### हवामान बदलाच्या...

बदलाच्या पार्श्वभूमीवर शास्त्रोक्त शेती पद्धतींचा अवलंब करण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई -प्रतिनिधी**

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे. अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून ''कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा'' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

# ''दीड कोटींच्या फसवणूक प्रकरणात तीन संचालक गजाआड'' न्यायालयाने १७ जूनपर्यंत सुनावली पोलीस कोठडी

**जालना । प्रतिनिधी**

छत्रपती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या माध्यमातून ठेविदारांची फसवणूक केल्याप्रकरणी जालना आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत अंबड शाखेशी संबंधित तीन संचालकांना अटक केली आहे. न्यायालयाने तिन्ही आरोपींना १७ जून २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून या प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार आणि गुंतवणूकदारांच्या पैशांच्या व्यवहारांचा तपास अधिक वेगाने सुरू झाला आहे.या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५५६/२०२४ अन्वये भारतीय न्याय संहिता () कलम ६१(२), ३१८(४), ३१६(२), ३१६(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम ( ) कलम ३, ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास जालना आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

**जास्त व्याजदराचे आमिष दाखवून गुंतवणूक**

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, छत्रपती मल्टीस्टेटचे चेअरमन संतोष बसवंत भंडारी, संचालक मंडळ आणि व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्तींनी ठेविदारांना इतर वित्तीय संस्थांपेक्षा अधिक व्याजदर देण्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या. सुरुवातीला आकर्षक परताव्याचे आश्वासन देत गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

मात्र, मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा झाल्यानंतर ठेविदारांना मुदतपूर्ती झाल्यानंतरही त्यांची रक्कम परत न मिळाल्याने फसवणुकीचे प्रकार उघड होऊ लागले. तक्रारीनुसार, चेअरमन संतोष भंडारी स्वतः अनेक गुंतवणूकदारांच्या घरी जाऊन त्यांना गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करत असल्याचेही तपासात समोर आले आहे.

**मराठवाड्यात २१ शाखांचे जाळे**

तपास यंत्रणेनुसार, छत्रपती मल्टीस्टेटच्या छत्रपती संभाजीनगर, बीड आणि जालना जिल्ह्यात एकूण २१ शाखा कार्यरत होत्या. या शाखांमार्फत मोठ्या प्रमाणावर ठेव संकलन करण्यात आले. विविध तक्रारी आणि प्राथमिक तपासातून अनेक गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेने फिर्यादी व साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे केलेल्या तपासात आतापर्यंत सुमारे दीड कोटी रुपयांच्या फसवणुकीचे स्वरूप समोर आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तपास पुढे सरकत असताना ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**तिन्ही संचालक अटकेत**

तपासादरम्यान खालील आरोपींचा गुन्ह्यात सक्रिय सहभाग आढळून आल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.

- राजीव सतीशराव काळे (वय ४०), रा. धनगर गल्ली, गेवराई, जि. बीड
- विठ्ठल पांडुरंग रुचके (वय ४७), रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड
- किरण अरुण तौर (वय ३०), रा. टाकरवन, ता. माजलगाव, जि. बीड

यापैकी राजीव काळे आणि विठ्ठल रुचके यांना ११ जून रोजी अटक करण्यात आली होती, तर किरण तौर याला १२ जून रोजी अटक करण्यात आली. तिन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता १७ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आणखी आरोपींच्या शोधासाठी तपास सुरू या प्रकरणातील मुख्य आरोपी, व्यवस्थापनातील इतर सदस्य तसेच आर्थिक व्यवहारांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची भूमिकाही तपासली जात आहे.

# देवगिरी किल्ल्यावर सारथीची स्वच्छता मोहीम; ४० संशोधक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत देवगिरी किल्ला परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सारथीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी योगदान दिले. सारथीतर्फे २६ मे ते २५ जून २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून १ ते ७ जून दरम्यान गड-किल्ले परिसर स्वच्छता उपक्रम हाती घेण्यात आला. व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील आणि उपव्यवस्थापकीय संचालक सुवर्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जून रोजी देवगिरी किल्ला, दौलताबाद येथे ही मोहीम पार पडली.

या मोहिमेदरम्यान किल्ला परिसरातून सुमारे १० गोणी कचरा संकलित करण्यात आला. त्यामध्ये सुमारे १२ किलो प्लास्टिक पिशव्या व अन्य टाकाऊ वस्तूंचा समावेश होता. दौलताबाद प्रशासनाच्या सहकार्याने संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. मोहिमेत एकूण ४० पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राहुल निकम यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी सकाळी ६ ते १० या वेळेत स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविली. तसेच सारथीच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला.

ऐतिहासिक वारसा स्थळांचे संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. स्वच्छता मोहिमेमुळे देवगिरी किल्ला परिसर अधिक स्वच्छ आणि पर्यटकांसाठी आकर्षक बनण्यास मदत झाली आहे.

# लम्पी चर्मरोग प्रतिबंधासाठी गोटपॉक्स लसीकरण मोहिम गतिमान करण्याचे पशुसंवर्धन आयुक्तांचे आवाहन

## पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसींचे वाटप सुरू

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

लम्पी चर्मरोगासारख्या संसर्गजन्य आजारांपासून राज्यातील गोधनाचे संरक्षणासाठी सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा तसेच शेतकरी बांधवांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.

पशुधनाचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हा सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय असून, सद्यस्थितीत ही मोहीम राज्यभर व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. पशुपालकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील केले आहे.

राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत गोटपॉक्स लसीकरण मोहिमेला गती देण्यात आली आहे. २०२६-२७ या वर्षासाठी आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांचे उत्पादन पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे सुरू असून, २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन पहिल्या टप्प्यात एकूण उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे वाटप नियोजनबद्ध पद्धतीने सुरू करण्यात आले आहे.

राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी ही लसीकरण मोहीम युद्धपातळीवर आणि तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था(पुणे)यांनी आवश्यक लसमात्रांचे उत्पादन यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. लसींचे वितरण जिल्हास्तरावर सुरू असून लस क्षेत्रीय स्तरावर पोहोचविताना शीतसाखळी (कोल्ड चेन) कुठेही खंडित होणार नाही याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या असून. गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षम पशुधनाचे प्राधान्याने लसीकरण करणे तसेच लसीकरण मोहिमेचा विभागनिहाय एकत्रित दैनंदिन अहवाल दररोज संस्थेकडे सादर केला जाणार.

# कापूस उत्पादकता अभियानासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान (कापूस क्रांती-) अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी शेतकऱ्यांना विविध पीक प्रात्यक्षिके व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा लाभ देण्यासाठी महाडीबीटी () पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने या अभियानाला पुढील पाच वर्षांसाठी मान्यता दिली असून, कापूस उत्पादन व उत्पादकता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. अभियानांतर्गत कापूस लागवडीतील सुधारित तंत्रज्ञानाचा प्रसार, पीक प्रात्यक्षिके, स्थानिक पातळीवरील बायोचार युनिट, कॉटन श्रेडर आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. पीक प्रात्यक्षिकांसाठी शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या (), कृषी क्षेत्रातील सहकारी संस्था तसेच आत्मा, पाणी फाउंडेशन आणि उमेद यांच्यामार्फत अर्ज करता येणार आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांकडे असणे बंधनकारक आहे.

कृषी विभागामार्फत विविध पीक प्रात्यक्षिकांसाठी बियाणे, जैविक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, फेरोमोन सापळे आदी निविष्ठांचा पुरवठा करण्यात येणार आहे. शेतकरी गट ३१ मार्च २०२६ पूर्वी नोंदणी केलेला असावा, तरी विभागातील छत्रपती संभाजी नगर, जालना बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.

## प्राथमिक आरोग्य केंद्र बाबरा जनआरोग्य समितीवर वैभव बनसोड यांची सदस्यपदी नियुक्ती

**फुलंब्री -प्रतिनिधी**

प्राथमिक आरोग्य केंद्र बाबरा, ता. फुलंब्री अंतर्गत जनआरोग्य समितीवर सामाजिक कार्यकर्ते वैभव एकनाथ बनसोड (रा. बाबरा) यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार हे नामनिर्देशन करण्यात आले असून समितीच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक प्रभावी व लोकाभिमुख करण्यासाठी त्यांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. वैभव बनसोड यांच्या सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग व जनहिताच्या विविध उपक्रमांतील योगदानाची दखल घेत त्यांची निवड करण्यात आली आहे. समितीच्या बैठका व विविध आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान; तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

विभागातील तेलबिया व कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करण्यासाठी तसेच स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (-) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत विविध प्रक्रिया युनिट्स व गोदामांसाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज मागविण्यात आले आहेत. योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी अंदाजित खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. तसेच १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल १९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेससह) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल.मिनी ऑईल मिल (फिल्टर प्रेस शिवाय ) या घटकासाठी किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. याशिवाय कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट (किमान क्षमता ३०० किलो प्रतितास) स्थापनेसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे.

गोदाम बांधकामासाठी एफपीओ, एफपीसी, सहकारी संस्था, सरकारी व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था () पात्र असून मूल्य साखळी भागीदार () गटांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे. तेल काढणी युनिटसाठी वैयक्तिक शेतकरी, एफपीओ, सहकारी संस्था, खासगी उद्योग आणि नोंदणीकृत नवीन तेल प्रक्रिया कंपन्या अर्ज करू शकतात. कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिटसाठी एफपीओ, क्लस्टर स्तरावरील महासंघ (), आणि वैयक्तिक उद्योजक पात्र आहेत. लाभार्थ्यांनी स्वतःचे किमान १५ टक्के भांडवल उपलब्ध करणे आवश्यक असून बँक कर्ज घेणे अनिवार्य आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज आपल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तातडीने सादर करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी सांगितले.

# माहोरा येथे अंबुजा सिमेंट कंपनी व अदानी फाऊंडेशन यांच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न

**दत्ता देशमुख**




दिनांक १२ रोज शुक्रवार या दिवशी माहोरा येथे अंबुजा सिमेंट कंपनी व अदानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आयोजन प्रथमेश हार्डवेअर माहोरा येथे करण्यात आले होते. त्यामध्ये माहोरा नगरीत खूप मोठ्या प्रमाणात रक्तदात्याकडून प्रतिसाद मिळाला असून यामध्ये भरपूर नागरिकांनी आपला सहभागही नोंदविला. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. या गोष्टीचा प्रत्यय माहोरा परिसरातील नागरिकांनी दाखवून दिला.यावेळी (२०)वीस रक्तदात्यांनी आपले रक्तदान दिले आहे.

यावेळी प्रतीक मालपाणी ,पवन कोल्हे, जय कानडजे, उत्तम कानडजे, रामेश्वर चिंचोले, अनिस पठाण ठेकेदार,आरबाज सय्यद उपस्थित होते.या सर्वांचे अंबुजा सिमेंट कंपनी व अदानी फाउंडेशन यांनी आभार मानले आहे. तसेच माहोरा नगरीतील नागरिकांकडून रक्तदात्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.


# टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या आळंद परिसरात बिबट्याची दहशत; वन विभागाने लावला पिंजरा

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील आळंद, कुंभारझरी व ब्रम्हपुरी परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. अनेक शेतकऱ्यांना बिबट्या प्रत्यक्ष दिसल्याचे सांगितले जात असून, कुंभारझरी परिसरात सुमारे दहा ते बारा दिवसांपूर्वी एका शेतकऱ्याच्या गायीवर हल्ला करून बिबट्याने तिला ठार केल्याची घटना घडली होती.

दरम्यान, ७ जूनच्या रात्री आळंद शिवारात बिबट्याने एका गायीच्या वासरावर हल्ला करून त्याला ठार मारल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच आळंदचे सरपंच राजीव गायकवाड यांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. त्यानुसार वन विभागाने तत्परता दाखवत आज सकाळीच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला. पिंजरा लावण्यासाठी वन विभागाचे अधिकारी सकाळी सुमारे ११ वाजता गावात दाखल झाले. यामध्ये वन परिमंडळ अधिकारी डोमळे साहेब



(भोकरदन), वनरक्षक हटकर साहेब, वनरक्षक वरशीळ साहेब तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी गावचे सरपंच, पोलीस पाटील व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.बिबट्याचा बंदोबस्त करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# सवलती बंद, खर्च वाढला! जाफ्राबाद-जालना प्रवाशांची साध्या बससाठी जोरदार मागणी

## महीला, वयोवृद्ध, विद्यार्थी, दिव्यांग, अधिस्वीकृतीधारक पत्रकार सवलतीपासून वंचित

**जाफ्राबाद । प्रतिनिधी**

जाफ्राबाद आगारातून जालना मार्गावर धावणाऱ्या बससेवेसंदर्भात प्रवाशांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आगाराला नुकत्याच प्राप्त झालेल्या नवीन 'शिवाई' बसपैकी बहुतांश बस जालना मार्गावर कार्यान्वित करण्यात आल्याने नियमित प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांना आर्थिक फटका बसत असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे. विशेषतः साध्या बसमध्ये मिळणाऱ्या विविध शासकीय सवलती 'शिवाई' बसमध्ये लागू नसल्याने विद्यार्थी, दिव्यांग, खाजगी कर्मचारी, शेतकरी, कामगार आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीला आधुनिक सुविधा असलेल्या 'शिवाई' बस सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. आरामदायी आसनव्यवस्था, तुलनेने चांगली प्रवास सुविधा आणि वेळेचे नियोजन यामुळे या बसांना सकारात्मक प्रतिसादही मिळाला. मात्र, काही दिवसांतच या व्यवस्थेचा दुसरा पैलू समोर आला. कारण ज्या प्रवाशांना शासनाकडून विविध प्रकारच्या प्रवास सवलती मिळतात, त्या सवलती 'शिवाई' बसमध्ये उपलब्ध नसल्याने त्यांचा प्रवास खर्च अचानक वाढला आहे. जाफ्राबाद ते जालना या मार्गावर दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी प्रवास करतात. अनेक विद्यार्थी महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था आणि स्पर्धा परीक्षा वर्गांसाठी जालना येथे ये-जा करतात. साध्या बसमध्ये मिळणाऱ्या सवलतींमुळे त्यांचा खर्च नियंत्रणात राहत होता. मात्र, आता 'शिवाई' बसमध्ये पूर्ण भाडे द्यावे लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या मासिक खर्चात मोठी वाढ झाली आहे.



अनेक पालकांनीही या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली असून, शिक्षणासाठी प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार करून किमान काही साध्या बसेस कायम ठेवाव्यात, अशी मागणी केली आहे.

दिव्यांग प्रवासी, अधिस्वीकृती धारक पत्रकार, महिला, ज्येष्ठ नागरिकांव्यतिरिक्त इतर सवलतधारक प्रवाशांनाही या बदलाचा मोठा फटका बसत आहे. दररोज कामानिमित्त जालना येथे जाणाऱ्या खाजगी कर्मचारी, शासकीय कार्यालयांतील कर्मचारी, किरकोळ व्यावसायिक आणि मजूर वर्गाला वाढीव भाड्याचा आर्थिक भार सहन करावा लागत आहे. सध्या जाफ्राबाद ते जालना या प्रवासासाठी 'शिवाई' बसचे भाडे सुमारे १४६ रुपये असल्याचे सांगितले जात आहे. नियमित प्रवास करणाऱ्या व्यक्तींसाठी हा खर्च महिन्याला हजारो रुपयांपर्यंत पोहोचत असल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, जाफ्राबाद बसस्थानकावर आजही अनेक नागरिक साध्या बसची वाट पाहताना दिसतात. अनेकदा साधी बस उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना नाईलाजाने 'शिवाई' बसने प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रवाशांमध्ये असंतोष वाढत असून, परिवहन प्रशासनाने परिस्थितीचा फेरविचार करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

या संपूर्ण प्रकरणात जाफ्राबाद आगार प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. प्रवाशांचा आरोप आहे की, सर्वच बस एकाच प्रकारच्या ठेवण्याऐवजी विविध आर्थिक स्तरातील नागरिकांचा विचार करून बससेवेचे संतुलन राखणे आवश्यक होते.

काही प्रवाशांनी आगार प्रमुखांच्या कार्यपद्धतीबाबतही नाराजी व्यक्त करत, प्रवाशांच्या गरजा आणि प्रत्यक्ष अडचणींचा पुरेसा विचार न करता निर्णय घेतल्याचा आरोप केला आहे.

जाफ्राबाद-जालना मार्गावर पूर्णपणे 'शिवाई' बसांवर भर देण्याऐवजी साध्या बस आणि 'शिवाई' बस यांचे संतुलित नियोजन करावे, अशी प्रमुख मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रत्येक फेरीत किंवा दिवसातील ठरावीक वेळांमध्ये साध्या बस उपलब्ध करून दिल्यास सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे. प्रवाशांच्या आर्थिक क्षमतेचा, सवलतधारक प्रवर्गांचा आणि ग्रामीण भागातील नागरिकांच्या गरजांचा विचार करून बससेवेचे पुनर्नियोजन करण्यात यावे, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. जाफ्राबाद-जालना मार्गावरील वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर केवळ आधुनिक सुविधा पुरेशा नसून परवडणारी आणि सर्वसमावेशक वाहतूक सेवा उपलब्ध होणेही तितकेच आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. आता परिवहन प्रशासन प्रवाशांच्या या मागण्यांकडे कितपत गांभीर्याने पाहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मंठा बसस्थानक परिसरातील अवैध प्रवाशी वाहतुक करणाऱ्या वाहनावर कारवाई

## उत्पन्न वाढीसाठी एसटीच्या सुरक्षा व दक्षता शाखेची विशेष मोहिम

**मंठा - योगेश राठोड**

मंठा.राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर अवैध प्रवाशी वाहतुकीचा मोठा परिणाम होत असून उत्पन्न वाढीसाठी एस.टी. स्थानकापासून २०० मीटरपर्यंत नो पार्किंग झोनची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. मंठा बसस्थानकातील नो पार्किंग झोन मधील वाहनांवर पथकाकडून कारवाई करण्यात आली.

जिल्ह्यात दिनांक ५ जून पासून धडक कारवाई मोहीम सुरु झाली आहे. राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी विविध बैठकामध्ये अवैध प्रवाशी वाहतुकीमुळे एसटीच्या महसुलात घट होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व विभागांना विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.



या मोहिमेअंतर्गत बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुक करणा-या वाहनांवर लक्ष ठेवले जात असून नियमभंग करणा-या वाहनांच्या विरोधात उपप्रादेशिक परिवहन विभाग व स्थानिक पोलिस यांच्या मदतीने कारवाई केली जाणार आहे. जालना विभागातील सर्व अधिकारी, पर्यवेक्षकीय कर्मचारी, आगार प्रशासन तसेच उपप्रादेशिक परिवहन विभाग व स्थानिक पोलिसांचे सहकार्य घेऊन अवैध वाहतुकीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

जालना विभागातील जालना मध्यवर्ती बसस्थानकासह अंबड, जाफ्राबाद, परतूर, बदनापूर, राजूर, घनसावंगी, कुंभारपिंपळगाव, शहागड, तीर्थपूरी, भोकरदन, आष्टी, मंठा व इतर सर्व प्रमुख बसस्थानकाच्या परिसरातही मोहिम राबविण्यात येत असून बसस्थानकाच्या बाहेरुन अनधिकृतपणे प्रवाशी वाहतूक करणा-या वाहनावर धडक कारवाई सुरू आहे. सर्व प्रवाशांनी एस.टी. *(पान २ वर)*

# जालन्यात १४ वर्षीय मुलीचे अपहरण करून बालविवाह; आरोपीस तीन वर्षे सक्तमजुरी

**जालना - प्रतिनिधी**

चौदा वर्षीय अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेऊन तिच्याशी बालविवाह करणाऱ्या आरोपीस जालना येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन वर्षे सक्तमजुरी व १५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. न्यायाधीश कुरेश विजय मोरे यांनी आरोपी रविंद्र परमेश्वर तारू, वय २०, रा. भारज खुर्द, ता. जाफ्राबाद यास पोक्सो कायदा, भा.दं.वि. कलम ३६३ व बालविवाह प्रतिबंधक कायद्यान्वये दोषी ठरवले.



दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपीने पीडित मुलीच्या आई शेतात कामाला गेल्याची संधी साधून तिला मोटारसायकलवरून पळवून नेले होते. त्यानंतर देवगिरी, छत्रपती संभाजीनगर, वेरूळ, पुणे, संभाजीनगर येथे नेऊन तिच्याशी बळजबरीने विवाह केला.

दि. ३१ मार्च २०२५ रोजी पीडिता जाफ्राबाद पोलीस ठाण्यात हजर झाली. विशेष सरकारी वकील वर्षा मुळीक यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले. एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. दंडाची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणात कोर्ट पैरवी टीमने विशेष मदत केली.

# लोणचे तयार करण्यात महिला मग्न; ग्रामीण भागात घरगुती लोणच्याला मागणी

## घरगुती लोणचे तयार करण्यासाठी कैऱ्या फोडून लोणचे भरताना दांपत्य

**दत्ता देशमुख**

चविष्ट आंबट आंब्यांपासून लोणचे तयार करण्याची ग्रामीण भागात जुनी परंपरा असून सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर लोणचे तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे.

यंदा गावरान आंबा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्याने लोणच्याची चवही वाढणार आहे. ग्रामीण भागातील महिलांकडून वेगवेगळ्या प्रकारचे आंब्याचे लोणचे तयार केले जातात. मोहरी,तिळ , जवस, कऱ्हाळे अशा धान्यापासून लोणचे तयार केले जातात यामध्ये लवंग मिरे हळद मीठ कळाची मेथी अशा प्रकारचे विविध मसाल्याचे पदार्थ यासाठी वापरले जातात.



लोणच्यासाठी शक्यतो आंबट चव असलेल्या आंब्याचा वापर केला जातो. सद्यस्थितीत ग्रामीण भागात बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर लोणच्याचा आंबा विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. पन्नास रुपये ते दोनशे रुपये किलो पर्यंत आंब्याचे दर आहेत. विशेष म्हणजे आंबा फोडण्यासाठी काही ठराविक मंडळी कडून काम केले जाते. कैऱ्यांची बारीक तुकडे करून व्यवस्थित रित्या लोणच्याचा मसाला भरणीत भरला जातो. वर्षभर शेतकरी वर्गाकडून या लोणच्याचा आस्वाद घेतला जातो. कैऱ्या फोडण्याचा वीस रुपये किलो दर लोणच्यासाठी कैऱ्या फोडण्याचा हातखंडा असलेल्या मंडळी कडून वीस रुपये किलो प्रमाणे उडण्याची मजुरी घेतली जाते. तर काही शेतकरी घरीच कैऱ्या फोडून लोणचे तयार करतात.

लोणच्यासाठी झाडांच्या कैऱ्या अलगद खोडी झेल्याद्वारे काढल्या जातात. ताज्या कैऱ्याचा *(पान २ वर)*

## टेंभुर्णी परिसरातील नांदखेडा येथे खरीप हंगाम शेतकरी मार्गदर्शन सभा

# हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील नांदखेडा येथे कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगाम शेतकरी मार्गदर्शन सभेचे आयोजन करण्यात आले होते. आगामी खरीप हंगामाच्या अनुषंगाने पीक नियोजन, हवामानातील बदल आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत या सभेत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हवामान बदलाला सामोरे जात शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा संदेश यातून देण्यात आला.

**एल निनोचा संभाव्य प्रभाव**

उप कृषी अधिकारी संतोष गिरी यांनी एल निनोच्या संभाव्य प्रभावावर प्रकाश टाकला. कमी कालावधीत येणाऱ्या सोयाबीन, कापूस, तूर आणि मका पिकांच्या वाणांची निवड, टोकन आणि बीबीएफ पद्धतीने लागवड, तसेच उताराला आडवी पेरणी करण्याबाबत त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. याशिवाय कमी पाण्यावर आणि पावसाच्या ताणात तग धरणाऱ्या पिकांची लागवड कशी करावी, याचीही माहिती दिली.



शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, बियाण्यांच्या पावत्या, पिशव्या आणि टॅग पीक काढणीपर्यंत जतन करून ठेवण्याचे महत्त्व यावेळी समजावून सांगण्यात आले. सहाय्यक कृषी अधिकारी निवृत्ती भगत यांनी बीजप्रक्रिया आणि बियाण्यांची उगवणक्षमता चाचणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तूर, मूग आणि उडीद पिकांसाठी उपलब्ध असलेल्या सीड किट योजनेअंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले. सोबतच शेतकऱ्यांना महाविस्तार ॲपचे फायदे आणि उपयोगही समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच बाबासाहेब सवडे, समाधान सवडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हवामान *(पान २ वर)*

# कासाबाई मोहिते यांचे निधन

**जालना -प्रतिनिधी**



तालुक्यातील मोतीगव्हाण येथील रहिवासी कासाबाई नारायण मोहिते (वय ८०) यांचे गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी मोतीगव्हाण येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कासाबाई मोहिते यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे व पणतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल विविध स्तरांतून श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून मोहिते कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे.


# टेंभुर्णीच्या शंकर मुळेंकडून चिमण्यांसाठी दाणापाण्याची सोय, पक्षी मित्र म्हणून नावलौकिक

**दत्ता देशमुख**


टेंभुर्णी येथील कोमल जनरल स्टोअरबाहेर दररोज शेकडो चिमण्यांचा किलबिलाट; उन्हाळ्याच्या झळांपासून पक्ष्यांना दिलासा

उन्हाळ्याचा कडाका वाढला असून रस्ते तापले आहेत. पाण्याचे स्रोत कोरडे पडत असल्याने माणसांसह पक्ष्यांचेही हाल होत आहेत. अशा परिस्थितीत टेंभुर्णीतील कोमल जनरल स्टोअरचे मालक शंकर मुळे यांनी दुकानाबाहेर चिमण्यांसाठी दाणापाण्याची सोय करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

वाढत्या सिमेंट कॉंक्रीटच्या जंगलात पक्ष्यांना निवारा मिळणे कठीण झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन मुळे यांनी आपल्या दुकानाच्या शटरजवळ सावलीत मातीची परात आणि दाण्याची ताटली ठेवली आहे. सुरुवातीला चार-पाच चिमण्या येथे येत होत्या. मात्र, आता दररोज शेकडो चिमण्या पाण्यासाठी आणि दाणे टिपण्यासाठी या ठिकाणी गर्दी करत आहेत. या उपक्रमामुळे बसस्थानकाजवळील







**चिवचिवाट म्हणजे सकाळची प्रार्थना**

''चिमण्या चिवचिव करतात तेव्हा प्रत्यक्ष देवच बोलत असल्यासारखे वाटते. एक आई पिलाला घास भरवते, दुसरी पाण्यात डुबकी मारते, हे दृश्य पाहून खूप समाधान मिळते. कडक उन्हात दुकानात काम करताना येणारा ताण या चिमण्या पाहिल्या की निघून जातो.''

**-शंकर मुळे,**
**व्यावसायिक**

हे दुकान आता परिसरातील नागरिकांसाठी आकर्षण केंद्र बनले आहे. चिमण्यांचा चिवचिवाट ऐकण्यासाठी आणि हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी अनेक ग्राहक मुद्दाम दुकानावर थांबतात. त्यामुळे हे पक्षीमित्र बनण्यासाठी प्लॅस्टिक किंवा स्टीलऐवजी मातीच्या भांड्याचा वापर करावा, जेणेकरून पाणी थंड राहते. पक्ष्यांना पिण्यासाठी ठेवलेले पाणी दिवसातून दोन वेळा बदलावे. घाण पाणी पक्षी पीत नाहीत. पक्ष्यांना मीठ किंवा तिखट नसलेले गहू, ज्वारी, बाजरी आणि तांदळाचे तुकडे खाण्यास द्यावेत. पाण्याचे भांडे उन्हात तापणार नाही याची काळजी घेत ते नेहमी सावलीत ठेवावे. ठिकाण आता पक्षीमित्र कट्टा म्हणून ओळखले जाऊ लागले आहे, असे विश्वनाथ सांगोळे यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले..

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.